# अर्ज निशाणी क्रमांक ११ खालील आदेश

**( पारीत केलेला दिनांक २४.८.२०२२)**

**०१**. प्रस्तूत अर्ज प्रतिवादी क्रमांक ०१ याने त्याच्याविरुध्द वादपत्रावर झालेला "**विना कैफियत**" आदेश रद्द करण्यासाठी **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१** नुसार दाखल केला आहे.

**०२**. प्रतिवादीने संयुक्तीक कारण नमूद केलेले नाही. म्हणून वादीने अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

**०३**. दोन्ही पक्षांतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**०४**. प्रतिवादीने **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१ सह वाचनीय क्रम ०५ नियम ०१** नुसार तीस अगर नव्वद दिवसांच्या मुदतीत कैफियत दाखल केली नाही. म्हणून त्याच्याविरुध्द **नि.क्र.०१** वर दिनांक **२१.०६.२०२२** रोजी दावा **"विना कैफियत"** चालवण्याचा आदेश झाला आहे.

**०५.** दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. प्रतिवादीला कैफियत दाखल करण्याची संधी नाकारल्यास त्याचे नुकसान होईल. प्रतिवादीला दाव्यामध्ये कैफियत दाखल करुन त्याचा बचाव मांडण्याची संधी दिल्यास वादाचे कायमपणे निराकरण होण्यास मदत होईल. वादीचे त्यामुळे कोणतेही नुकसान संभवत नाही.

**०६.** म्हणून प्रतिवादीविरुध्द **दिवाणी व्यवहार संहिता १९०८ चा क्रम ०८ नियम १०** नुसार दावा **"विना कैफियत"** चालवण्याचा झालेला आदेश **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१** नुसार रद्द करणे उचित होईल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## **आदेश**

१. अर्ज **नि.क्र.११** मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक ०१ विरुध्द वादपत्र **नि.क्र.०१** वर दावा **"विना कैफियत”** चालवण्याचा झालेला आदेश **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१** नुसार त्याने वादीला खर्च रक्कम रुपये १००/– देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2022.08.25 10:50:23 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**

**दिनांक :– २४/०८/२०२२.** **दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण :– औसा.** **जिल्हा लातूर.**